नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १३/०४/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## दुचाकी वाहन चोरणारा जरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक ०९/०४/२२ रोजी फिर्यादी नामे विनोद पंढरीनाथ बोबडे, वय ४२ वर्षे, रा. वार्ड क्रमांक ३, महाजन लेआउट सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तक्रार दाखल केली की, दिनांक ०६/०४/२२ ते ०७/०४/२२ रोजी रात्रीच्या दरम्यान त्यांनी प्रोफेसर कॉलनी सावनेर येथील भुडे हॉस्पिटल यांचे दवाखान्या समोर उभी करून ठेवलेली त्यांची बजाज प्लेटिना मोटरसायकल क्रमांक MH-40/AH- 8728 हि चोरीस गेलेली आहे. अशा त्यांच्या तक्रारी वरून पो स्टे सावनेर येथे मोटरसायकल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण हे करीत होते. आज दिनांक १३/०४/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पेट्रोलिंग करीत असताना यातील संशयित इसम नामे शुभम राजकुमार नागपुरे, वय २६ वर्ष राहणार, वार्ड क्रमांक ३, हेटी, त. सावनेर हा पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील ब्राह्मणी फाटा येथे संशयित रित्या दुचाकी वाहनांनी फिरतांना मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने वरील गुन्हा केल्याचे सांगितले. त्यावरून चोरीस गेलेल्या मोटर सायकल बाबत गुन्हे अभिलेख तपासून खात्री करून त्याच्या ताब्यातून सदर गुन्ह्यात चोरीस गेलेली बजाज प्लेटिना मोटरसायकल क्र. MH-40/AH- 8728 जप्त करून आरोपीस जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करिता पोलीस स्टेशन सावनेर यांचे ताब्यात दिले.

सदरची कार्यवाही मा.श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, मा.श्री. राहुल माकणीकर अप्पर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा राजेंद्र रेवतकर, पोना आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, रोहन डाखोरेझ अमोल वाघ, सतीश राठोड, चालक अमोल कुथे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर